**Scholarly Research Journal for Humanity Science & English Language,**
**Online ISSN 2348-3083, SJ IMPACT FACTOR 2021: 7.278, www.srjis.com**
PEER REVIEWED & REFEREED JOURNAL, AUG-SEPT, 2021, VOL-9/47

# डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठातील पदव्युत्तर शिक्षण घेत असताना स्पर्धा परीक्षेची तयारी करणाऱ्या विद्यार्थ्यांच्या विविध शैक्षणिक समस्यांचा अभ्यास

**निकम सुभाष एकनाथ[१] & सुहास एस. पाठक[२], Ph. D.**

[१] *शिक्षणशास्त्र विभाग, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद.*

*ईमेल - subhashnikam83@gmail.com*

[२] *सहाय्यक प्राध्यापक, शिक्षणशास्त्र विभाग, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद.*

**Paper Received On:** 25 SEPT 2021
**Peer Reviewed On:** 30 SEPT 2021
**Published On:** 1 OCT 2021

***Scholarly Research Journal's* is licensed Based on a work at *www.srjis.com***

**प्रस्ताविक :**

आजचे युग हे स्पर्धेचे युग आहे. त्यामुळे प्रत्येक क्षेत्रामध्ये व्यक्तीला स्पर्धा करावी लागत आहे. आज लोकसंख्या वाढल्यामुळे लोकांच्या गरजाही खूप वाढल्या आहेत. आपल्या गरजा पूर्ण करण्यासाठी प्रत्येकाला स्पर्धा करावी लागत आहे. आज समाजामध्ये शिक्षण घेणाऱ्यांचे प्रमाणही खूप वाढले आहे. परंतु सर्वांना नोकरी मिळत नाही. पदवी, पदव्युत्तर शिक्षण घेऊनसुद्धा नौकरी मिळत नाही. त्यामुळे शिक्षण आहे, परंतु नोकरी नाही अशी परीस्थिती आज समाजामध्ये निर्माण झालेली आहे. शिक्षण घेऊन नोकरी मिळत नसेल तर ते शिक्षण काय कामाचे असाही एक मतप्रवाह समाजामध्ये आहे. आज समाजामध्ये नोकरी मागणारे खूप आहेत, परंतु त्यांना नोकरी देणारे कमी आहेत. लोकसंख्या वाढल्यामुळे व कौशल्यपूर्ण शिक्षण नसल्यामुळे प्रत्येकाला नोकरी मिळणे शक्य नाही. आज प्रत्येक क्षेत्रामध्ये आपल्याला नोकरी मिळावी यासाठी विद्यार्थी प्रयत्न करत आहे. त्यासाठी विद्यार्थी शिक्षण घेत असतानाच स्पर्धा परीक्षेची तयारी करत आहे. घरची आर्थिक परीस्थिती गरीबीची असल्यामुळे अनेक विद्यार्थी ग्रामीण भागातून शहरामध्ये येऊन शिक्षण घेत असतानाच स्पर्धा परीक्षेची तयारी करत आहे.

समाजामध्ये सरकारी नोकरी असणे खूप महत्त्वाचे मानले जाते. त्यामुळे अनेक विद्यार्थी एम.पी.एस.सी., यु.पी.एस.सी. सारख्या स्पर्धा परीक्षा देऊन अधिकारी पदावर काम करत आहे. समाजामध्ये बेरोजगारीचे प्रमाण वाढल्यामुळे अनेक तरुणांना लग्नांसाठी ही अडचण येत आहे. सरकारी नोकरी असेल तरच मुलांना लग्नासाठी मुली तयार होतात. त्यामुळे नोकरीला असणे खूप महत्त्वाचे आहे. स्पर्धा परीक्षेच्या माध्यमातून कोणत्याही प्रकारे

*Copyright © 2021, Scholarly Research Journal for Humanity Science & English Language*

पैसा न देता नोकरी मिळते. त्यामुळे विद्यार्थी पदव्युत्तर शिक्षण घेत असतानाच स्पर्धा परीक्षेचा अभ्यास करत आहे.

**संशोधनाची गरज :**

१) विविध स्पर्धा परीक्षेविषयी विद्यार्थ्यांचे मत जाणून घेणे.

२) कोणत्याही प्रकारे पैसे न भरता सरकारी नोकरी मिळते.

३) चांगले कर्मचारी-अधिकारी यांची निवड होण्यासाठी पदव्युत्तर शिक्षण व स्पर्धा परीक्षेची माहिती मिळावे.

४) शासनासाठी मार्गदर्शन

५) गुणवत्तेवर आधारीत नोकरी मिळविण्यसाठी

६) जगातील प्रत्येक घटनेची माहिती मिळवण्यासाठी

**संशोधनाची गृहीतके :**

१) विद्यापीठामध्ये पदव्युत्तर शिक्षण घेत असलेले विद्यार्थी स्पर्धा परीक्षेची तयारी करतात.

२) विद्यापीठामध्ये स्पर्धा परीक्षेचे मार्गदर्शन मिळते.

३) विद्यापीठामध्ये नोकरी मेळावा आयोजित केला जातो.

४) विद्यापीठामध्ये शिक्षण घेणारा विद्यार्थी हा सर्वसामान्य कुटुंबातील आहे.

५) विद्यापीठातील विद्यार्थ्यांना स्पर्धा परीक्षेची तयारी करताना अनेक समस्यांना तोंड द्यावे लागते.

**संशोधनाची उद्दिष्ट्ये :**

१) विद्यापीठामध्ये पदव्युत्तर शिक्षण घेत असलेल्या विद्यार्थ्यांचा शोध घेणे.

२) विद्यापीठामध्ये स्पर्धा परीक्षेची तयारी करणाऱ्या विद्यार्थ्यांचा शोध घेणे.

३) पदव्युत्तर शिक्षण घेत असताना स्पर्धा परीक्षेची तयारी करणाऱ्या विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक व आर्थिक परीस्थितीचा अभ्यास करणे.

४) विद्यापीठातील विभागामध्ये स्पर्धा परीक्षेसाठी राबविण्यात येणाऱ्या उपक्रमाचा शोध घेणे.

५) स्पर्धा परीक्षेसाठी काय उपाय-योजना केली पाहिजे याचा अभ्यास करणे.

**संशोधन समस्येची परीकल्पना :**

१) विद्यापीठामध्ये शिक्षण घेणारे अनेक विद्यार्थी स्पर्धा परीक्षेची तयारी करतात.

२) विद्यापीठामध्ये विद्यार्थ्यांना स्पर्धा परीक्षेस मार्गदर्शन केले जाते.

३) विद्यापीठामध्ये स्पर्धा परीक्षेची तयारी करणाऱ्या विद्यार्थ्यांना विविध समस्यांना तोंड द्यावे लागते.

**संशोधनाची जनसंख्या व न्यादर्श :**

*Copyright © 2021, Scholarly Research Journal for Humanity Science & English Language*

**जनसंख्या :**

प्रस्तुत संशोधनामध्ये संशोधकाने औरंगाबाद शहरातील डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठातील स्पर्धा परीक्षेची तयारी करणाऱ्या एकूण ५०० विद्यार्थ्यांपैकी १६० विद्यार्थ्यांची नमुना म्हणून निवड करण्यात आली आहे.

**नमुना :**

प्रस्तुत संशोधनासाठी संशोधकाने सहेतुक नमुना निवड पद्धतीचा वापर केला आहे. संशोधन समस्येची निगडीत जनसंख्या ही मोठी असल्याने संशोधकाने आपल्या उद्दिष्टानुसार ही असंभाव्यता नमुना निवडीमधील सहेतुक नमुना निवड पद्धतीचा वापर केला आहे. तसेच सदर संशोधनासाठी संशोधकाने औरंगाबाद शहरातील डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठातील स्पर्धा परीक्षेची तयारी करणाऱ्या एकूण ५०० विद्यार्थ्यांपैकी १६० विद्यार्थ्यांची नमुना म्हणून निवड केली आहे.

**संशोधन पद्धती :**

प्रस्तुत संशोधनासाठी सर्वेक्षण पद्धतीचा वापर करण्यात आला आहे.

**संशोधनाचे साधन :**

संशोधनासाठी प्रश्नावली या साधनांचा वापर करण्यात आला आहे.

**निष्कर्ष :**

१) विद्यापीठामध्ये शिक्षण घेण्यासाठी विद्यार्थी हे ग्रामीण भागातून आले आहेत.

२) विद्यार्थ्यांच्या गावामध्ये चौथी ते सातवीपर्यंत शिक्षणाची सोय आहे.

३) स्पर्धा परीक्षेचा अभ्यास करत असताना पदव्युत्तर अभ्यासक्रमाकडे दुर्लक्ष होते.

४) स्पर्धा परीक्षेत गणित विषयाची अडचण येते.

५) स्पर्धा परीक्षेत विचारण्यात येणाऱ्या प्रश्नामुळे काही प्रमाणात संदिग्धता निर्माण होते.

६) स्पर्धा परीक्षेचा अभ्यास करताना आर्थिक अडचणींना तोंड द्यावे लागते.

७) स्पर्धा परीक्षेचा अभ्यास करण्यासाठी कला शाखा चांगली आहे.

८) विभागामध्ये स्पर्धा परीक्षेचे उपक्रम राबविले जात नाही.

९) स्पर्धा परीक्षा प्रत्येक जिल्ह्यात घेण्यात यावी.

१०) स्पर्धा परीक्षेतील गैरप्रकार थांबविणे.

*Copyright © 2021, Scholarly Research Journal for Humanity Science & English Language*

**संदर्भसूची :**

*दांडेकर वा. ना. (१९८५) शैक्षणिक मुल्यमापन व संख्याशास्त्र, पुणे : श्री. विद्या प्रकाशन.*
*भिंताडे वि. रा. (२००७) शैक्षणिक संशोधन पद्धती, पुणे : नित्यनूतन प्रकाशन.*
*भांडारकर, के. एम. (२०१०), सुलभ शैक्षणिक संख्याशास्त्र, पुणे : नुतन प्रकाशन.*
*शेरकर, गणेश आणि जोशी शो. (२००७), शैक्षणिक मूल्यमापन व कृतीसंशोधन, औरंगाबाद : मृण्मयी प्रकाशन.*
*पाठक सुहास (२०१०), संशोधक आराखडा, सुर्यकांत दांगेकर, औरंगाबाद : किर्ती प्रकाशन.*
*आगलावे प्रदीप (२०००) संशोधक पध्दतीशास्त्र व तंत्रे, नागपूर : विद्या प्रकाशन.*
*मुळे रा. श. आणि उमाठे, वि. तु. (१९९८) शैक्षणिक संशोधनाची मुलतत्त्वे, नागपूर : महाराष्ट्र साहित्य निर्मिती मंडळ नागपूर.*
*पंडित बी. बी. (२००९) शिक्षणातील संशोधन अभिकल्प, पुणे : नूतन प्रकाशन.*
*कुलकर्णी अर्पणा, देव नेहा (२०१३), शैक्षणिक संशोधन, पुणे : नित्य नुतन प्रकाशन.*
*यजुवेन्द्र महाजन, महेश गोरडे (२०१८), अभ्यास मित्र, जळगाव : दिपस्तंभ प्रकाशन.*
*ब्रिजमोहन दायमा, (२०००), नेट-सेट मार्गदर्शक, पुणे : विद्याभारती प्रकाशन*
*नागरे विश्वास (२०१०), मन में है विश्वास, पुणे : राजहंस प्रकाशन*
*मनोहर भेळे (२०१५), अभ्यास ते अधिकारी, पुणे : युनिक अकॅडमी.*

*Copyright © 2021, Scholarly Research Journal for Humanity Science & English Language*